## दहा हजार कोटींनी वाढला प्रकल्पाचा खर्च

# करोनाकाळातही मेट्रो ३ची पाच हजार कोटींची कामे पूर्ण

### कारशेडचा तिढा वाढल्याने प्रकल्पाला विलंब

**म. टा. प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) करोनाकाळातही कामाचा सपाटा सुरू ठेवला आहे. एप्रिल २०२०पासून आतापर्यंत 'मेट्रो ३' मार्गिकेच्या पाच हजार कोटी रुपयांहून अधिक किंमतीची कामांची पूर्तता झाली आहेत. ७१ टक्के कामे पूर्ण झाली तरी कारशेडचा तिढा कायम आहे. त्यामुळे या प्रकल्पाला विलंब होत असल्याने खर्चातही वाढ झाली आहे. त्यामुळेच या मार्गिकेचा खर्च २३ हजार कोटींवरून ३३ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहचला आहे.

आरे येथे 'मेट्रो ३'च्या कारशेड उभारणीला पर्यावरणवाद्यांनी विरोध केला होता. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर हे कारशेड आरे येथून कांजूरमार्गला हलविण्याचा निर्णय सरकारने घेतला. मात्र कांजूरची जागा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत कारशेडचा तिढा कायम आहे.

एमएमआरसीएलकडून 'मेट्रो ३' मार्गिकेतील कारशेड व्यतिरिक्त अन्य कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. सद्यस्थितीत मेट्रो मार्ग प्रकल्पावर १६ हजार कामगार काम करत आहेत. आतापर्यंत मेट्रोच्या भुयारीकरणाचे ९७ टक्के काम पूर्ण झाले आहे. तर महालक्ष्मी स्थानक ते नेहरू विज्ञान केंद्र स्थानकादरम्यानचे काम बाकी आहे.

मेट्रो मार्गिकेवरील स्थानकांचे ७७ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यापैकी ११ स्थानकांची ८५ टक्क्यांहून अधिक कामे पूर्ण झाले आहे. तर १० स्थानकांचे ७५ टक्के काम, तर ५ स्थानकांचे ५० टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झालेले आहे.



**प्रकल्पाची सद्यस्थिती**

- प्रकल्पाचे ७१ टक्के काम पूर्ण.
- मेट्रो ३ मार्गिकेच्या भुयारीकरणाचे ९७ टक्के काम पूर्ण.
- मेट्रो मार्गिकेवर ट्रॅक बसवण्याचे १८ टक्के काम पूर्ण.
- प्रकल्पातील प्रणाली यंत्रणेची ३४ टक्के कामे पूर्ण.
- स्थापत्य काम ८२ टक्के पूर्ण.
- स्थानकांचे ७७ टक्के काम पूर्ण.

- करोनाकाळात म्हणजेच एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२१ अखेर या काळात सुमारे ५ हजार कोटींची कामे करण्यात आली.
- टनेलिंग सेग्मेंट रिंग बसविण्याचे ६,७२१ मीटर अंतराचे काम पूर्ण केले.
- बेस स्लॅबचे ३३,५१४ चौरस मीटरचे काम केले.
- कॉन्कोर्स स्लॅबचे ४८,३३६ मीटरचे काम केले.
- पोटमाळ्याचे आणि कार पार्किंगच्या स्लॅबचे ८,९४२ मीटरचे काम पूर्ण केले.
- छताच्या (रुफ) ५८,५०३ मीटर स्लॅबचे काम पूर्ण केले.
- सिद्धीविनायक मंदिर आणि एमआयडीसी स्थानकात प्रत्येकी १ लिफ्ट आणि सरकता पादचारी जिना बसविण्याचे काम पूर्ण केले.